पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली
जनसंपर्क शाखा
P.R.O Office, Gadchiroli
**Phone No.** 07132223142 **Address**: SP Office,Gadchiroli
**E-mail** : prospoffice.gadchiroli@gmail.com

# वार्तापत्र

दिनांक २४/०७/२०१९

## वार्तापत्र

## ‘‘ नक्षल्यांचा डाव गडचिरोली पोलीस दलाने उधळला’’

**→ घातपाताच्या दृष्टीने नक्षल्यांनी पेरुन ठेवलेला भुसुरुंग निकामी करण्यात बॉम्ब शोधक पथकाला यश**

उपविभाग गडचिरोली अंतर्गत येणा-या पो.म.के रेगडी येथे तैनात असलेले पोलीस अधिकारी व कर्मचारी आज रोजी सकाळी ०८.३० वा. दरम्यान रेगडी ते कोतेपल्ली रोडदरम्यान रोडओपनिंग करण्यासाठी सर्च अभियान राबवित होते. यावेळी जवानांना माडे आमगाव फाटया नजीक असलेल्या नाल्यावरील पुलाजवळ नक्षल्यांनी भुसुरुंग पेरुन ठेवल्याचे आढळुन आले.

यामुळे तातडीने गडचिरोली येथील बॉम्ब शोधक व नाशक पथकास घटनास्थळावर पाठविण्यात आले. बॉम्ब शोधक व नाशक पथक गडचिरोली यांनी यशस्वीरित्या ८ ते१० किलाग्रॅम वजनाचा भुसुरुंग निकामी केल्याने नक्षलवाद्यांचा मोठा घातपात घडवून आणण्याचा मनसुबा गडचिरोली पोलीस दल उधळवून लावण्यात यशस्वी झाले.